# महाराष्ट्र विधानपरिषद

## पत्रक भाग दोन

**रविवार, दिनांक ७ डिसेंबर, २०२५ / अग्रहायण १६, १९४७ (शके)**

**११७. औचित्याचे मुद्दे ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्याबाबत सर्व सन्माननीय विधानपरिषद सदस्यांना कळविण्यात येते की :-**

**१.** महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सोमवार, दिनांक ८ डिसेंबर, २०२५ रोजीपासून विधान भवन, नागपूर येथे सुरु होणाऱ्या सन २०२५ च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनासाठी द्यावयाचे औचित्याचे मुद्दे सोमवार, दिनांक ८ डिसेंबर, २०२५ रोजीपासून सकाळी ९.३० ते सायंकाळी ५.०० या वेळेत **PROIS** या संगणकीय प्रणालीवर स्वीकारण्यात येतील.

**२.** **ONLINE** पध्दतीने प्राप्त होणाऱ्या औचित्यांच्या मुद्द्यांना संगणकीय प्रणालीद्वारे आपोआपच अनुक्रमाने नोंदणी क्रमांक दिला जाईल व त्याबाबत मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचा निर्णय अंतिम असेल.

**३.** औचित्याचे मुद्दे पूर्णत: **ONLINE** पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्यामुळे सन्माननीय सदस्यांनी पुन्हा त्याच विषयाची पुनरावृत्ती करणारी सूचना **OFFLINE** पध्दतीने दिल्यास ती विचारात घेतली जाणार नाही.

**४.** औचित्याच्या मुद्द्याचा विषय हा गंभीर स्वरुपाच्या व तातडीच्या सार्वजनिक महत्वाच्या कोणत्याही बाबीसंबंधातील, स्पष्ट, एकाच विभागाशी संबंधित, मुद्देसूद व थोडक्यात ठेवून सूचनाधीन विषयाचा सारांश २ ते ३ ओळींमध्ये असणे आवश्यक आहे. तसेच सूचनेचा विषय ज्या विभागाशी संबंधित आहे त्या विभागाचे नांव स्पष्टपणे दर्शविण्यात यावे.

**५.** औचित्याचे मुद्दे स्वीकृती संबंधी व स्वीकृत मुद्दे सभागृहात घेण्यासंबंधीचा पूर्ण अधिकार मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचा राहील.

**विधान भवन,**
**नागपूर.**
**दिनांक : ७ डिसेंबर, २०२५.**

**डॉ.विलास आठवले,**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**



\\mls-e२-०९\D\Ashish Jadhav\Kamtekar\Auchityache Mudde\२०२५\तिसरे अधिवेशन\Note and Patrak bhag-२\Patrak Bhag-२.docx

**याची प्रत :-**

**१)** महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य.

**२)** मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.

**३)** मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

**४)** सचिव (३), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे स्वीय सहायक.

**५)** सचिव (४), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे स्वीय सहायक.

**६)** महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.

**७)** महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.

**८)** संगणक कक्ष (WEBSITE)

**९)** एम.के.सी.एल. प्रशिक्षण विभाग.

---------